# नगर अर्बन को-ऑप. बँक लि., अहमदनगर

<u>(मल्टी स्टेट शेडयुल्ड बँक )अहमदनगर</u>



---

## बँक रोड, पोस्ट बॉक्स नं.७, अहमदनगर

**<u>Customer Compensation Policy</u>**

**2014-2015**

# Customer Compensation Policy

**Customer compensation policy is approved by Board of Director in their Meeting held on .07/04/2014, by passing Resolution No. 9**

Bank have well documented customer compensation policy duly approved by our board. The bank has made the model policy formulated by the Indian bank association (IBA) in this regard. The Bank policy has incorporated the following aspect-

1) **Erroneous Debits arising on fraudulent or other transaction**

**जर एखादया ठेवीदाराच्या खात्याला दुस-या खातेदाराचा चेक नावे टाकून रक्कम कमी झाली अगर नजरगहाण कॅश क्रेडीट खात्याला चुकुन नावे पडून कर्जदा-याच्या खात्याची येणे बाकी वाढली तर ठेवीदार अगर खातेदाराला त्या रक्कमेवरील व्याजाचा भुर्दंड पडतो. चुकीच्या व्यवहारामुळे खातेदाराची ठेव कमी होवून त्याचे व्याजाचे नुकसान होते. त्यामुळे अशा खातेदारांना सदर रक्कमेवर झालेल्या कालावधीनुसार मुदत ठेवीचे व्याज अदा करावे लागेल. सदर व्याजाची रक्कम संबंधीत सेवकांकडून वसूल केली जाईल**

2) **Payment of Interest for delays in collection.**

**खातेदारानी क्लिअरिंगसाठी चेक बँकेत जमा केले अगर कलेक्शनसाठी बाहेर गावचे चेक बँकेत जमा केले तर क्लिअरिंग नियमाप्रमाणे लोकल चेक खातेदाराला त्याच दिवशी जमा दिले पाहिजे किंवा परत आलेले चेक क्लिअरिंग कालावधीच्या नियमाप्रमाणे परत दिले पाहिजे. बाहेर गावचे चेक 15 दिवसाच्या आत ठेवीदारास जमा दिले नाही तर आर. बी. आय पॉलीसीप्रमाणे रक्कम उशिरा जमा दिल्याबाबत उशीर झालेल्या कालावधीचे ठेवीच्या व्याज दराप्रमाणे खातेदारास व्याज अदा करावे लागेल.**

3) **Payment of Interest for delay in issue of Duplicate Draft**

खातेदाराने बँकेक डून खरेदी केलेला डी. डी. गहाळ झाला व खातेदाराने डयुप्लिकेट डी. डी.ची मागणी केल्यास संबंधीत बँकेकडे डी डी चे स्टॉप पेमेंट करुन स्टॉप पेमेंट बाबत कन्फरमेशन घेवून डयुप्लिकेट डी. डी. ची रक्कम 10 दिवसात अदा केली  पाहिजे. सदर डी. डी. ची रक्कम खातेदारास उशिरा अदा केल्यास बँकेच्या मुदत ठेवीच्या प्रचलित नियमानुसार व्याज अदा करावे लागेल.

4) **Other Unauthorised action of the Bank leading to a Financial loss to Customer**

बँकेतून आर. टी.जी.एस. व नेफ्ट योजना कार्यान्वित आहेत. सदर रक्कमा पाठवितांना बँकेकडून काही चुक झाल्यास रक्कमा चुकीच्या खातेदाराच्या खात्यात जमा झाल्यास खातेदाराचे आर्थिक नुकसान होते व आर्थिक नुकसानीमुळे उशिरा जमा झालेल्या रक्कमेचा खातेदारास आर्थिक भुर्दंड सोसावा लागतो. अशा अनियमित व्यवहारांमुळे खातेदाराचे  ज्या कालावधीत नुकसान झाले त्या कालावधीचे व्याज मुदत ठेवीच्या नियमाप्रमाणे खातेदारास अदा करावे लागेल.

5) Payment of Compensation for delay beyond 15 days in return of securities /documents to Borrower

कर्जदाराचे कर्ज खाते बंद झालेनंतर कर्ज खातेदाराने त्याने कर्जासाठी  बँकेत ठेवलेल्या सिकयुरिटी किंवा कागदपत्रांची मागणी केल्यास व ते कागदपत्र देण्यास जर उशिर झाला  व त्यामुळे कर्जदाराचे काही आर्थिक नुकसान झाले तर व त्याने नुकसान भरपाईची मागणी केली तर मा. संचालक मंडळ सभेच्या  मंजूरीने सदर नुकसान भरपाई रिझर्व बँकेच्या नियमानुसार दयावी लागेल.

**As per Board of Directors Resolution No. 9 dated 07/04/2014**

**Hon. Chairman** **Chief Executive Officer**